रेमुनं. ९८/२०१७

नि. १५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीबाबत प्रतिवादींनी ति—हाईत इसमांचे हक्क निर्माण करु नयेत अशा जैसे थे आदेशासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे देवून शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणतेही व्यवहार करता येत नसल्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. प्रतिवादींना दिनांक ३०/३/२०१७ रोजी दाव्याचे समन्स मिळाले असून ते प्रकरणात हजर झालेले आहेत. आज अखेर मुदत देवून सुध्दा प्रतिवादींनी कैफीयत किंवा म्हणणे दिलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा खरेदीखत पुर्ण होवून मिळावे यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दरम्यान दावा मिळकत विक्री केली किंवा ति—हाईत इसमांचे हक्क निर्माण केले तर वादींचे नुकसान संभवते. केवळ दावा मिळकतीच्या संरक्षणासाठी जैसे थे आदेश दिल्यास योग्य व संयुक्तिक होणार आहे. सबब मी पुढील आदेश देत आहे :—

आदेश

वादी व प्रतिवादींनी दावा मिळकतीबाबत पुढील तारखेपर्यन्त जैसे थे परिस्थिती ठेवण्याची आहे.

दिनांक ११/४/२०१७

सुमित वि. जोशी
सह दिवाणी न्यायाधीश क. स्त.,
दौंड जि. पुणे